99e

# जाहिरात
## महाराष्ट्र शासन
## महिला व बाल विकास विभाग

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ मधील प्रकरण ३ मधील कलम ४ ( १ ) तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील प्रकरण २ मधील नियम ३ व ४ मध्ये व सुधारीत अधिसुचना दि.२८.१२.२०२० महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०२० बाल न्याय मंडळ गठित करण्याची तसेच मंडळाची रचना याबाबतची तरतूद आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०१८ च्या नियम ९१ च्या अधिन राहून खालील नमुद **नांदेड,चंद्रपुर,पुणे व नागपूर या** जिल्हयामधील बाल न्याय मंडळ सदस्य या रिक्त पदाकरीता विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर जाहिरातीबाबतची जिल्हानिहाय नियुक्त करावयाची पदे याबाबतची माहिती,पदे,पात्रता,अटि व शर्ती याबाबत अधिक माहितीसाठी शासनाच्या www.maharashtra.gov.in व http://wcdcommpune.com या अधिकृत संकेतस्थळावर भेट दयावी.

(राहुल मोरे)
**आयुक्त,**
**महिला व बाल विकास,**
**महाराष्ट्र राज्य पुणे १.**

# जाहिरात मसुदा

## महाराष्ट्र शासन

## महिला व बाल विकास विभाग

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ मधील प्रकरण ३ मधील कलम ४ ( १ ) तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील प्रकरण २ मधील नियम ३ व ४ मध्ये व सुधारीत अधिसुचना दि.२८.१२.२०२० महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०२० बाल न्याय मंडळ गठित करण्याची तसेच मंडळाची रचना याबाबतची तरतूद आहे. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०१८ च्या नियम ९१ च्या अधिन राहून खालील नमुद जिल्हयामधील बाल न्याय मंडळ सदस्य या रिक्त पदाकरीता विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

**बाल न्याय मंडळ जिल्हा निहाय रिक्त पदे**

| अ.क्र | जिल्हा | एकुण सदस्य संख्या | नियुक्त करावयाची पदे |
|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | ०२ | ०२ |
| ०२ | चंद्रपुर | ०२ | ०२ |
| ०३ | पुणे | ०२ | ०२ |
| ०४ | नागपूर | ०२ | ०१ |
| | एकुण रिक्त पदे | ०८ | ०७ |

**वरील पदांसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत त्याचप्रमाणे अर्जदार हा खालील क्षेत्रातील नामांकित, कार्यक्षम व अनुभवी असावा.**

१. बाल न्याय मंडळ सदस्यांचे वय अर्जाच्या दिनांकास ३५ वर्षापेक्षा कमी नसावे.

२. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०२० सुधारीत अधिसुचना दि.२८.१२.२०२० अन्वये शिक्षण, आरोग्य व कल्याण कार्याच्या क्षेत्रामधील बालकांसबंधीत काम करण्याचा किमान सात वर्षाचा अनुभव असेल अथवा बाल मानसशास्त्र, मनोविकृतीचिकित्सा,समाजशास्त्र किंवा विधी यामधील पदवीसह व्यावसायिक कार्य करीत असावेत.

३. बाल न्याय मंडळाच्या कामकाजाशी हितसंबंध असणारी किंवा स्वत:ची बालकांची काळजी घेणारी संस्था इ. असणा-या व्यक्तीची मंडळावर समाजसेवक सदस्य म्हणूण नियुक्ती केली जाणार नाही.

४.नियुक्ती कालावधी हा प्रधान दंडाधिका-याखेरीज मंडळाचे इतर दोन सदस्य, दोन कमाल सत्रांपर्यंतच्या, जे सलग नसतील, नियुक्ती करीता पात्र असतील.

५.सदरची नियुक्ती हि नियुक्तींच्या दिनांकापासुन तीन वर्षाच्या कालावधीकरीता असेल.

### अटी व शर्ती

- वरील मुददा क्रमांक १ व २ मध्ये नमूद केले नुसार वय, शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक आहे.
- बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ मधील कलम ४(४) अन्वये खालील नमुद व्यक्ती बाल न्याय मंडळ सदस्य म्हणुन निवडीसाठी पात्र नसेल.

- मानवी हक्क किंवा बाल हक्काचे उल्लंघन केलेले नसावे, तसेच मानवी हक्क किंवा बाल हक्काचे उल्लंघन याबाबत भुतकाळातीलही नोंदी नसाव्यात.

- नैतिक अध:पतनाचा आरोप नसावा व नैतिक अध:पतनाचा समावेश असलेल्या एखादया अपराधासाठी दोषी ठरवले गेले आहे आणि अशा प्रकारचे निर्दोषत्व परत करण्यात आले नाही किंवा सदर अपराधाबददल पुर्ण माफी दिली गेली नाही.
- केंद्र शासन, राज्य शासन व त्यांचे उपक्रम, निमसरकारी संस्था किंवा महामंडळ या सेवातून निलंबित अथवा काढून टाकलेला नसावा.
- बालकांचे शोषण,बाल मजुरी किंवा इतर कोणत्याही मानवी हक्काचे उल्लंघन किंवा अनैतिक कृत्यात कधीही सहभागी नसावा.
- तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०१८नियम ९१ (६) अन्वये निवड समितीने निवडलेला सदस्य हा

  **अ)** अर्जदार हा बाल न्याय मंडळाच्या कामकाजाकरीता आवश्यक वेळ व पुरेसे लक्ष देवू शकणार नाही असे एखादे पुर्णवेळ पद धारण करणारा नसावा.

  **ब)** बाल न्याय मंडळाचा सदस्य हा त्याच्या नियुक्त कालावधीमध्ये कोणत्याही काळजी घेणा-या संस्था (Child Care Institution) यांच्याशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जोडलेला नसावा किंवा अशा संस्थेशी त्याचा अन्य प्रकारे हितसंबंध असता कामा नये.

  **क)** सदस्य हा नियुक्ती कालावधीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात कोणतेही पद धारण करणारा नसावा.

  **ड)**सदस्य हा दिवाळखोर नसावा.
- महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०१८नियम ९१ (५) नुसार निवडप्रक्रियेपुर्वी सर्व अर्जदारानी पोलिस विभागाकडून प्राप्त केलेले चारित्रप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- अर्जदारानी विहित नमुन्यातील हमीपत्रे व संमतीपत्र देणे बंधनकारक राहिल.
- अर्जदार हा त्याच जिल्हयाचा रहिवासी असावा.

वर नमुद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटींची पुर्तता करणा-या इच्छूक व्यक्तिंनी खालील विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम आवश्यक कागदपत्रांसह जाहिरात प्रसिध्द झालेपासून **१५** दिवसांच्या आत आपले जिल्हयातील सबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावेत. तसेच सदरची जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in व http://wcdcommpune.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

(राहुल मोरे)
आयुक्त,
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य पुणे १.

## महाराष्ट्र राज्यातील जिल्हयांसाठी बाल न्याय मंडळ सदस्य या पदावर नियुक्ती करणेबाबत इच्छूक व्यक्तींची नामनिर्देशन करण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज

१. नाव
२. जन्मतारीख (वय)
३. पत्ता, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक/ ई-मेल आय. डी .
४. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र | शैक्षणिक पात्रता | वर्ष | विद्यापीठाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|

५. शिक्षण, आरोग्य व कल्याणकार्याच्या क्षेत्रातील बालकांसोबत काम करण्याचा किमान सात वर्षाचा अनुभव अहवाल अथवा बाल मानसशास्त्र, मनोविकृती चिकित्सा,समाजशास्त्र किंवा विधी यामधील पदवीसह व्यावसायिक कार्य करीत अहवाल.

| अ.क्र. | अनुभवः- शिक्षण, आरोग्य व कल्याणकारी क्षेत्रातील (बालकांशी निगडित कार्याचा कालावधी) | कार्यालयाचे नाव | यंत्रणेचे नाव | पदाचे नाव | थोडक्यात कार्य |
|---|---|---|---|---|---|

६. नोकरी / व्यवसायाबाबत तपशील कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक
७. बाल विकास क्षेत्रातील अनुभव आहे का? असल्यास तपशिल.
८. अर्जदार व्यक्तीचे बाल न्याय मंडळावर काम करण्यासाठीचे हमीपत्र व संमतीपत्र.
९. अर्जदाराची इतर कोणत्याही समितीवर नियुक्ती झाली आहे काय? असल्यास त्याबाबतचा तपशील.

आपला विश्वासू
(स्वाक्षरी संपूर्ण नाव व पत्ता)